


# बुकमार्क

एक सुंदर बुकमार्क कसे बनवावे हे ह्या शिकवणीमध्ये तुम्हाला शिकता येईल.




सर्व पुस्तकप्रेमी आणि त्यांच्या सर्जनशील, उत्साही पुस्तकप्रेमी मित्रांसाठी, हे प्रोजेक्ट आपल्याला काही आवश्यक गण मिळविण्यास मदत करेल. हे सोपे आणि सुंदर आहे. एक सुंदर बुकमार्क कसे बनवावे हे ह्या शिकवणीमध्ये तुम्हाला शिकता येईल. जर तुम्ही त्यापैकी एक आहात ज्यांना पुस्तके वाचणे तितकेच आवडते जितके शिवणकाम करायला, तर हे तुमच्यासाठी अतिउत्तम आहे.

बुकमार्क बनविण्यासाठी तुम्हाला लागणारे आवश्यक साहित्य - एक 8 x 1.5" कांबळाच्या कापडाचा तुकडा, तुमच्या पसंतीचा एक लहान रंगीत कापडाचा तुकडा, काही टाचण्या, दोरा, मार्कर, एक फुटपट्टी आणि एक नागमोडी कात्री. नागमोडी काठ तयार करण्यासाठी कांबळाच्या कापडाचे काठ नागमोडी कात्रीने कापा, असे केल्याने एक सुंदर डिझाईन तयार होईल आणि कापड सुद्धा झिजणार नाही.

फॅब्रिकच्या मध्यभागी एक रेष ओढा.
फुलाच्या आकारातील तुकडा कापडावर ठेवा आणि ते व्यवस्थित राहण्यासाठी टाचणी लावा.
शिवणकाम सुरु करण्याची वेळ झालेली आहे.
शिवण्यासाठी मशीन ॲडजस्ट करा. पॅटर्न सेलेक्टरला 'C' वर फिरवा आणि स्टीच लेंथ सेलेक्टरला 'SS' मोडमध्ये करा.



फुलाच्या आकारातील तुकड्यापर्यंत पोहोचेपर्यंत चिन्हांकित रेषेवर शिवत राहा. शिवताना दोऱ्यासाठी विरुद्ध रंगाचा वापर करा जेणेकरून डिझाईन उठून दिसेल.

शिलाईचा पॅटर्न बदलण्यासाठी सुई उचला. स्टीच पॅटर्न सेलेक्टरला ‘A’ वर फिरवा आणि स्टीच लेंथ सेलेक्टरला ‘SS’ मोडमध्येच राहू द्या.

आता जिथे शिवणकाम थांबवले होते, तेथून शिवणे चालू करा.
फुलाच्या मध्यभागी लावलेली टाचणी काढा आणि त्याच्या मध्यभागापर्यंत शिवा. सुई वर करा आणि दोन्ही बाजूने जो अतिरिक्त दोरा असेल तो कापून टाका.



बघा! तुमचा बुकमार्क तयार आहे.
आम्ही या बुकमार्कसाठी फुलाच्या आकारातील तुकड्याची निवड केली आहे. पण तुम्ही स्वतःच्या आवडीचा कापडी तुकडा निवडण्यास अथवा तयार करण्यास स्वतंत्र आहात.
उदाहरणार्थ, एक मोठा आणि एक लहान चौरस वेगळ्या प्रकारे ठेवू शकता. किंवा कोणत्याही कल्पित कृतीसारखा किंवा आपल्या विचारांप्रमाणे अर्थपूर्ण आकृतीचा तुकडा असू शकतो, अगदी काहीही वापरता येते.